Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# व्यासस्मृतीमधील दानविषयक विचार

डॉ. अंबरीष खरे
सहायक प्राध्यापक
श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## भारतीय परंपरेतील दानसंकल्पना

दानाचे माहात्म्य प्राचीन भारतीय साहित्यात थेट ऋग्वेदापासून सापडते. वैदिक साहित्यामध्ये दानस्तुती उपलब्ध आहेत. [1] रामायण आणि महाभारत यांसारखी आर्ष महाकाव्ये आणि पुराणे या साहित्यामध्येही दानासंबंधी शेकडो संदर्भ उपलब्ध आहेत. अग्निपुराण, मत्स्यपुराण आणि वराहपुराण या ग्रंथांमध्ये दानाचे माहात्म्य विशेष रीतीने सांगितल्याचे काणे यांनी स्पष्ट केले आहे.[2]

दान म्हणून कोणत्या गोष्टी देता येतात, याविषयी देखील भारतीय परंपरेमध्ये सविस्तर आणि सखोल विचार झाला आहे. दानाचे महत्त्व केवळ वैदिक आणि पौराणिकच नव्हे, तर बौद्ध आणि जैन धर्मांमध्येसुद्धा आहे. हे श्रमणधर्म असल्याने दानाच्या पायावरच ते उभे राहिले आहेत, असे म्हणता येईल.

## स्मृतिसाहित्य

प्राचीन भारतीय समाजामध्ये प्रचलित असलेल्या नीतिनियमांना धर्म असे संबोधले जात असे. आपल्याला जे ब्राह्मणाचा धर्म, गृहस्थाचा धर्म, गुरूचा धर्म, पित्याचा धर्म, अशा स्वरूपाचे शब्दप्रयोग सापडतात, त्या सर्व ठिकाणी धर्म या शब्दाचा अर्थ त्यांचे त्यांचे नियत (नेमून दिलेले) कर्तव्य असा होतो.

दुसऱ्या शब्दांत , समाजात प्रचलित असलेले नीतिनियम , मनुष्याने बजावायची कर्तव्ये, समाजाने लागू केलेले कायदे यांना धर्म असे म्हटले जाते. या धर्माची नोंद ठेवणारे वाङ्मय धर्मशास्त्र म्हणून ओळखले जाते. हे धर्मशास्त्रीय ग्रंथ स्मृती या नावानेही ओळखले जातात.

मनुस्मृती अथवा याज्ञवल्क्यस्मृती यांसारख्या मोठ्या स्मृतींमध्ये विविध प्रकारचे नियम सांगण्यात आले आहेत, ज्यामध्ये वर्णाश्रमव्यवस्था, संपत्तीचे वाटप करण्याविषयीचे, वारसाहक्काचे नियम, जमिनीच्या नोंदी ठेवण्याचे आणि न्यायनिवाडा करण्याविषयीचे नियम इत्यादी अनेक गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. परंतु अन्य अनेक छोट्या आकाराचे स्मृतिग्रंथ असेही आहेत , ज्यांमध्ये केवळ वर्णाश्रमधर्माचे विवेचन असते.

## व्यासस्मृतिमधील दानसंकल्पना

प्रस्तुत निबंधामध्ये जिचा विचार करायचा आहे, ती व्यासस्मृती ही देखील याच प्रकारची, फारसा विस्तार नसलेली स्मृती आहे. महर्षी वेदव्यास वाराणसी नगरीत बसले असता त्यांना विचारले गेलेले

प्रश्न आणि त्यांनी दिलेली उत्तरे अशा स्वरूपात या स्मृतीची रचना केली आहे. या ग्रंथातील चार अध्यायांपैकी पहिल्या तीन अध्यायांमध्ये वर्णाश्रमधर्माचे मुख्य विवेचन आले आहे. शेवटचा (चौथा) अध्याय हा फलश्रुती स्वरूपाचा असून त्यामध्ये आधी सांगितलेल्या विषयांचेच काहीसे अधिकचे स्पष्टीकरण केले गेले आहे. गृहस्थाश्रमाची प्रशंसा, तीर्थांचे माहात्म्य यांसारखे विषय याठिकाणी येतात.

गृहस्थाश्रमाचे वर्णन करताना ही स्मृती म्हणते- खरोखरच गृहस्थाश्रमापेक्षा मोठा धर्म नाही. सगळ्या तीर्थांचे फल असलेला हा गृहस्थाश्रम जो स्मृतिनियमांनुसार पाळतो, त्याला सर्व तीर्थांचे फल प्राप्त होते.[3]

दानाच्या दृष्टीने विचार केल्यास ब्राह्मणांना महत्त्व असल्याने ही स्मृती सांगते की, जो ब्राह्मणांना पाय धुण्यासाठी पाणी, पायांचे रक्षण व्हावे यासाठी पादत्राणे, त्याचप्रमाणे दिवा आणि अन्न या वस्तू नियमितपणे देतो, त्याच्याजवळ यम येत नाही. म्हणजेच, अशा व्यक्तीला अकालमृत्यू येत नाही.[4]

जे धन दान म्हणून दिले जाते, तसेच ज्या धनाचा एखादी व्यक्ती स्वतः उपभोग घेते, तेवढेच खरे त्या व्यक्तीचे धन होय. इतर (न वापरलेले) धन आणि त्या व्यक्तीच्या स्त्रिया आदींचा उपभोग तर नातलगच घेतात, असे व्यासस्मृती सांगते. यामागचे कारण असे की, जे शरीर चांगले राखण्यासाठी मनुष्यप्राणी त्या धनाची इच्छा धरतात, ते शरीर नश्वर आहे. ते नष्ट झाल्यावर धनाचा काहीच उपयोग नाही. [5] त्यामुळे ज्या अतिरिक्त धनाचा आपण उपभोग घेऊ शकत नाही, त्यापैकी निदान काही भाग तरी दानासारख्या पुण्यफलकारक कृत्याकरिता वापरणे कधीही श्रेयस्कर होय.

त्याचप्रमाणे, व्यासस्मृती असे सांगते की, न बोलावता आणि न मागता जे दान दिले जाते त्याचे माहात्म्य युगांतापर्यंत अबाधित राहते.[6]

आपल्या आई-वडिलांना, भावांना आणि सासऱ्यांना, तसेच पत्नी आणि अपत्यांना दिलेल्या वस्तूंमळे मनुष्यास अनंतकाळापर्यंत स्वर्गप्राप्ती होते. वडिलांना दिलेले दान शंभरपटीने, आईला दिलेले दान हजारपटीने, बहिणीस दिलेले दान लाखपटीने तर भावास दिलेले दान अगणित पटींनी लाभदायक असते, असे हा स्मृती सांगते.[7]

## समारोप

भारतीय संस्कृतीचा विचार करायचा झाल्यास प्राचीन काळापासूनच दानाला अतिशय महत्त्व असल्याचे दिसते. त्याचबरोबर जिला दान देणार, ती व्यक्ती विशिष्ट गुणांनी युक्त असणे आवश्यक मानले गेल्याचे दिसते. म्हणजेच, दानाचे जे काही फल आहे, ते ज्यावेळी दान योग्य व्यक्तीला दिले जाते त्यावेळीच दानकर्त्याला प्राप्त होते. अपात्री दान देण्याने ते फल मिळत नाही, असे परंपरा सांगते.

व्यासस्मृती हा स्मृतिपरंपरेतील छोटा ग्रंथ असल्याने त्यामध्ये वर्णाश्रमधर्माचे विवरणच मुख्यत्वेकरून सापडते. असे असूनही दानाचे महत्त्व या स्मृतीमध्ये आवर्जून सांगितल्याचे आपल्याला दिसून येते. ब्राह्मणांना दान देण्याचे महत्त्व याठिकाणी सांगितले आहेच; परंतु आईवडील, भाऊबहीण, सासरे अशा नातेवाईकांना देखील दान देणे अतिशय पुण्यकारक असल्याचे व्यासस्मृती सांगते.

टीपा

1. उदाहरणार्थ, पहा- ऋग्वेद 1.125, 5.61, 8.46, 9.62 इत्यादी.

2. काणे (1941: 841).

3. गृहाश्रमात् परो धर्मो नास्ति नास्ति पुनः पुनः ।
सर्वतीर्थफलं तस्य यथोक्तं यस्तु पालयेत् ॥- व्यासस्मृती 4.२.

4. पादोदकं पादघृतं दीपमन्नं प्रतिश्रयम् ।
यो ददाति ब्राह्मणेभ्यो नोपसर्पति तं यमः ॥- व्यासस्मृती 4.8.

5. यद्ददाति यदश्नाति तदेव धनिनो धनम् ।
अन्ये मृतस्य क्रीडन्ति दारैरपि धनैरपि ॥
किं धनेन करिष्यन्ति देहिनोऽपि गतायुषः ।
यद्वर्द्धयितुमिच्छन्तस्तच्छरीरमशाश्वतम् ॥ - व्यासस्मृती 4.17-१८.

6. अनाहूतेषु यद्दत्तं यच्च दत्तमयाचितम् ।
भविष्यति युगस्यान्तस्तस्यान्तो न भविष्यति॥ - व्यासस्मृती 4.27.

7. मातापितृषु यद्दद्याद् भ्रातृषु श्वशुरेषु च ।
जायापत्येषु यद्दद्यात् सोऽनन्तः स्वर्गसंक्रमः ।।
पितुः शतगुणं दानं सहस्रं मातुरुच्यते ।
भगिन्यां शतसाहस्रं सोदरे दत्तमक्षयम् ।।- व्यासस्मृती 4.29-30.

सन्दर्भग्रन्थसूची

1. आनन्दाश्रम (सम्पा.) 1905. *स्मृतीनां समुच्चयः*. पुणे: आनन्दाश्रम.

2. त्रिपाठी, श्यामसुंदरलाल बाँकेलाल (अनु.) 1830. *अष्टादशस्मृति*. मुंबई: खेमराज श्रीकृष्णदास.

3. Dutt, Manmath Nath (tr.) 1979. *The Dharam Shastra: Hindu Religious Codes*. Vol. III. Reprint. New Delhi: Cosmo Publications.

4. Kane, P. V. 1941. *History of Dharmasastra: Ancient and Mediaeval Religious and Civil Laws*. Vol. II, Part 2. Poona: Bhandarkar Oriental Research Institute.

5. Sontakke, N. S. and Kashikar, C. G. (ed.) 2000-2014. *Rgveda-Samhita with the Commentary of Sayanacarya*. Reprint. Pune: Vaidika Samshodhana Mandala.

********